Vol 2 Issue 12 June 2013

Impact Factor : 1.2018 (GISI)

ISSN No :2231-5063

Monthly Multidisciplinary
Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**IMPACT FACTOR : 0.2105**

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## International Advisory Board

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## Editorial Board

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Golden Research Thoughts
Volume 2, Issue. 12, June. 2013
**ISSN:-2231-5063**
Available online at www.aygrt.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# संसद, संविधान व सर्वोच्च न्यायालय

*प्रताप वामनराव पाटील*

राज्यशास्त्र विभाग प्रमुख बहिर्जी स्मारक महाविद्यालय, वसमत ता. वसमत जि. हिंगोली

**सारांश**

भारतीय संसद तत्वतरु सार्वभौम असली तरी तिचे सर्वश्रेष्ठतव संविधानाने प्रदान केलेल्या अधिकार कक्षेतच मर्यादित आहे. त्यामुळे संसदेला आपली कायेदविषयक सत्ता घटनेच्या चौकटीतच वापरावी लागते. त्याशिवाय सर्वोच्च न्यायालयास प्राप्त झालेल्या घटनादत्त अधिकारानुसार संसदेची अधिकारकक्षा नियंत्रित झाली आहे. हे लक्षात घेउनच संसदेची सर्वोच्चता व न्यायालयाचे अधिकार याबाबत सविस्तर चर्चा करावी लागेल.

**प्रस्तावना**

संविधानातील कलम 137अंतर्गत प्राप्त झाालेल्या न्यायिक पुनर्विलोकन अधिकारानुसार संसदेची कायदे करण्याची सत्त नियंत्रित आहे. मर्यादीत सत्ता विभाजन या तत्वांचा अवलंब करून सत्त संतुलन व सहयोग राखण्याचा रास्त प्रयत्न संविधानकर्त्यांनी केला आहे. तेव्हा या पार्श्वभूमीवर संसद, मंत्रिमंडळ व न्यायपालिका यांच्यातील परस्परसंबंध श्रेष्ठ – कनिष्ठ या तत्वावर आधारित नसून तिन्ही संस्थांनी परस्परांना पूरक असेच अधिकार वापरावेत हीच अपेक्षा होती. संसदेचे स्थान व सत्ता लक्षात घेता हे स्पष्ट होते की, संसदेने केलेल्या कोणत्याही कार्यवाहीत (अर्थात संविधानांतर्गत) न्यायालयास हस्तक्षेप करता येत नाही. मात्र संसदेने पास केलेल्या घ्टनात्मक व सर्वसामान्य कायद्याची वैधता तपासून पहाण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयास घटनेने प्रदान केलेला आहे. तर दुस–या बाजून महाभियोग खटला चालवून न्यायाधिशाना पदभ्रष्ट करण्याचा संसदेचा अधिकारही अंतर्भुत आहे.

छुसरा महत्वाचा मुदद्‌ा असा की, कायद्याने प्रस्थापित प्रक्रिया या तत्वानुसार संसदेने केलेल्या कायदा न्यायालय घटनाबाहय म्हणून घोषित करू शकते. मात्र अमेरिकेतील न्यायालयाप्रमाणे कायद्याची उचित प्रक्रिया या तत्वानुसार संसदेचे कायदे घटनाबाह्य ठरविण्याचा अधिकार आपल्या सर्वोच्च न्यायालयास नाही. या विधानाचा सरळ अर्थ असा होतो की, संसदेने केलेला कायदा उचित आहे की अनुचित हे आपले न्यायालय ठरवू शकत नाही. तर संबंधित कायदा संविधानातील तरतुदींशी सुसंगत आहे की नाही एवऐच पडताळून पहाण्याची सत्ता न्यायपालिकेला देण्यात आलेली आहे. पर्यायाने ससदेने घटनेच्या अंतर्गत केलेल्या कोणत्याही कायद्यात न्यायालय हस्तक्षेप होतो हा प्रश्न पडतो. वस्तुतः या दोन्ही संस्थांनी अपापली अधिकार कक्षेची मर्यादा न ओलांडता सत्ता वापरली तर घटनात्मक वाद उपस्थित होण्याचा प्रश्च उद्‌भवत नाही.

परंतु आजपर्यंतचा अनुभव असा आहे की, मौलिक संरचनेचा मुद्‌दा उपस्थित करून न्यायालयाने संसदेने केलेल्या अनेक घअना दुरूस्त्या अवैध घोशित केल्या. तेव्हा संसदेने सर्वोच्च न्यायालयाची अधिकार कक्षा व न्यायिक पुनर्विलोकनाची सत्ता नियंत्रित व मार्यादित करण्यासाठी संविधानात दुरूस्त्या घडवून आणल्या व त्यावरही जेव्हा घटनामक वाद उभा राहिला. त्यांची साधार चर्चा पूढीलप्रमाणे करता येईल.

संसद संविधाननिमिर्तीत असल्यामुळे संविधानापेक्षा श्रेष्ठ नाही. संवैधानिक प्रक्रियेद्वारेच तिला आपली कायदे निर्मितीची सत्ता वापरावी लागते. त्यामुळे इंग्लंडच्या पार्लमेन्टप्रमाणेतीसर्वश्रेष्ठ किंवा  सार्वभौम बनू शकली नाही. लिखित व ताठर राज्यघटना, या तत्वामुळे संसद स्वयंभू बनू शकली नाही. ही वस्तुस्थिती आहे. एवऐच नाही तर संविधान विशोधनाचा अधिकारसुध्दा संसदेला अमर्यादपणे वापरता येत नाही. तर संविधान विशोधनाचा अधिकारसुध्दा संसदेला अमर्यादपणे वापरता येत नाही. हे सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी सिध्द केलेले आहे. राज्यघटनेतील कलम 368 नुसार व ठरवून दिलेल्या पध्दतीनेच संसदेला आपला घटनादुरुस्तीचा अधिकार वापरता येतो विशेष म्हणजे कलम 368 ची व्याप्ती वमर्यादा स्पश्ट करण्याचाी अंतिम सत्ता संर्वेच्च न्यालयाकडे असल्यामुळे संसदेच्यचा घटनादुरुस्तीचा अधिकारही मर्यादितच ठरतो. उदा. संसदेने 1971साली`केलेली पंचविसावी घटनादुरुस्ती सवोच न्यायालयाने घटनाबाहय म्हणून घोषीत केली होती याचाच अर्थ असा की, कायदेनिर्मितीच्या प्रक्रियेत संसद शक्तिमान असली तरी तिचे सर्वश्रेष्ठतव राज्यघटनेच्या अंतर्गतच आहे.तर दुस.या बाजूने राज्यघटनेने सर्वेच्च न्यायालयाच्या अधिकारक्षेत्राची सविस्तर सविस्तर चर्चा केलेली असल्यामुळे व राज्यघटनेचा संरक्षक म्हणून सत्ता प्रदान केली असल्यामुळे संसदेच्या अधिकारकक्षा सीमित झाल्या आहेत मात्र या सर्व चर्चेतून एक प्रश्न पडतो तो असा की,दोन्ही संसथांच्या घटनादत्त अधिकाराची अस्पष्ट सीमारेषा ज्याचा आधार घेउुन आतापर्यंत सर्वेच न्यायालयाने संसदेच्या अधिकार क्षेत्रावर सतत आक्रमण केले असा आरोप संसद करत आली तर दुसदुस-या बाजूने सिमा रेशा स्पष्ट करण्याचाही अधिकार आपणास आहे अशी भुमिका न्यायालयाने घेतलेली आहे.

संसद घटनेच्या कोणत्याही भागात दुरुस्ती करण्यास अधिकारपात्र असली तरी अराज्यघटनेची पायाभूत संरचना मोडण्याचा किंवा ओलांडण्याचा तिला मुळीच अधिकार नाही असे सर्वेच्च न्यालयाने केशवानंद भारती खटल्याचा निर्णय देताना स्पष्ट केले होते. तेव्हापासून पायाभूत संरचनेचा नवाच वाद घटनात्मक उपस्थित झाला. त्याचा परिणाम असा झाला की,वरील निर्णयामुळे संसदेची अधिकारकक्षा घटना दुरुस्तीची अधिकच अस्पष्ट झाली.घटनेला पायाभूत संरचना असते काय़ ? इथपासुन तर संसदेला राज्यघटनेत कोणत्याही स्वरुपाचा व कोणत्याही भागात बदल करण्याचा अंतिम अधिकार आहे. इथपर्यंत वादग्रसत अशा चर्चेला सुरुवात झाली जी आजपर्यंतही अधूनमधून डोके वर

**Title :** *संसद, संविधान व सर्वोच्च न्यायालय*
**Source:Golden Research Thoughts [2231-5063]** *प्रताप वामनराव पाटील* **yr:2013 vol:2 iss:12**

काढताना दिसते.

घटनात्मक पातळीवार संसदेची भूमिका रास्त असली तरी न्यायालयाने अनेक प्रसंगातून व निर्णयांतून संसदेच्या अधिकारांना आव्हान दिलेले आहे.अगदी 1951 पासून आजपर्यंत संसद विरुध्द सर्वेच्च न्यायालय असा घटनात्मक अधिकाराबाबतचा संघर्ष अनेक वेळा उपस्थित झाला. काही वेळा न्यायालयाने पडती बाजू घेउन संसदेचे कायदा करण्याबाबतचे श्रेष्ठतव मान्य केले. मात्र घटनेतील कलमाचा अर्थ लावण्याची अंतिम सत्ता संविधानकर्त्यांनी न्याय पालिकेकडेच सोपविलेली आहे. हा आधार घेउन राज्यघटना काय सांगते?याबाबत संसद किंवा कार्यपालिका मंत्रीमंडळ काहीच भष्य करू शकत नाहीत अशी ताठर भूमिका न्यायालयाने वेळोवेळी घेतल्यामुळे दोन्ही संस्थांतील अधिकार कक्षांबाबत सतत संदिग्धता कायम राहिली. संसदीय कडून मंत्रिमपरिशदेकडे व प्रधानमंत्रीय पध्दतीकडे शासनाची वाटचाल अगदी झपाटयाने झााल्यामुळे संसद प्रभावहीन झाली. काही काळाचा अपवाद वगळता देशात एकपक्षीय प्रधानपध्दती रूढ झाल्यामुळे ही प्रक्रिया अधिकच वेगाने घडून आली. तर दुस–या बाजूला न्यायपालिकेने आपला न्यायिक पुनर्विलोकनाचा अधिकार अधिक प्रभावीपणे वापरून आपलेच सर्वश्रेष्ठतव सिध्द करण्याचा यशस्वी प्रयत्न केला.

वस्तुतः राज्यघटनेतील काही तरतुदी संदिग्ध असल्यामुळे कलमांचा अर्थ स्पष्ट करतांना घटनात्मक पेचप्रसंग निर्माण होतो. ढोबळमानाने सत्तेचे विभाजन व सत्तेचे संतुलन ही संकल्पना राज्यघटनेने स्वीकृत केलेली असली तरी व्यवहारात मात्र पूर्णपणे सत्तेचे विभाजन अंमलात येउ शकले नाही. उलट सत्तेचे संतुलन राखण्यासाठी प्रत्येक संस्थेची अधिकार कक्षा उचित बंधनाने सीमित केली आहे. घटनेतील तरतुदीनुसार कोणीच सार्वभौम नाही. यामागे राज्यघटनेचे पवित्र्य अबाधित राहावे हाच प्रधान हेतू होता व आहे. लोकतांत्रिक संस्था राबविताना व त्या संस्थांतील अधिकार उपभोगताना लोकमताची संस्था राबविताना व त्या संस्थांतील अधिकार उपभोगताना लोकमताची व जनतेच्या हक्क – स्वातंत्र्याची पायमल्ली होउ नये हीच अपेक्षा होती. मात्र नंतरच्या काळात राजकीय स्वार्थाने प्रेरित होउन राज्यघटनेत दुरूत्या होउ लागल्या. काही प्रसंगी न्यायालयाने पडती बाजू घेउन आक्षेपही घेतला नाही. परंतु काही दुरूस्त्याबाबत ताठर भुमिका घेउन संसदेला आव्हान दिले व संसदेला कायदानिर्मितीची सत्ता असली तरी त्याची व्याप्ती निश्चित करण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाचा आहे असे वेळोवेळी सुचित केले. अनेक घटनादुरूस्त्या प्रकरणातून असे वाद उपस्थित झाले आहेत. 1950 साली जो आजपर्यंत वेगवेगळी वळणे घेत कायम आहे.

संविधानात दुरूस्ती करण्याची तरतूद असलेले 368 वे कलम न्यायालयीन क्षेत्रात वादग्रस्त ठरले. पहिल्या घटनादुरसती मूलभूत अधिकारात जो फेरफार संसदेने केला तो घटनाबाह्य किंवा घटनाविरोधी म्हणून रद्दबातल करण्याचा न्यायालयास अधिकार आहे काय? असा प्रश्न उपस्थित झाला. गोपालन विरूध्द मद्रास राज्य या खटल्यापासून वादाला सुरूवात झाली. संसदेच्या सार्वभौमत्वास कात्री लावण्याची सत्ता न्यायालयास असू शकत नाही अशी भूमिका संसद व कार्यपालिकेने घेतली. शेवटी न्यायालयाने संसदेचा राज्यघटनेत दुरूस्ती करण्याचा अधिकार मान्य केला. हीच स्थिती पुढे तब्बल सतरा वर्षे कायम राहिली. आपल्या न्यायिक पूनर्विलोकनाच्या मर्यादा मान्य करून न्यायालयाने संसदेचे श्रेष्ठतव अप्रत्यक्षरीत्य मान्यच केले. संसदेने कायदा करावा, मूलभूत अधिकारांचा संकोच होतो म्हणून न्यायालयाने ती घटनादुरूस्ती घटनाबाह्य म्हणून घोषित करावी तर त्याला प्रतिउत्तर म्हणून संसदेने पुन्हा घटनादुरूस्ती करून संबंधित घटनादुरूस्ती न्यायालयीन अधिकार क्षेत्राच्या बाहेर ठेवण्याचा यशस्वी प्रत्यत्न करावा असे सतत तीन वेळा घडले. जमीनदारी निर्मूलन कायदा करण्यापासून ही प्रक्रिया सुरू झाली. नंतर त्यासाठी राज्यघटनेतील कलम 31 मध्ये बदल करण्यासाठी चौदावी दुरूस्ती करण्यात आली.

1967 साली मात्र न्यायालयाने उलट भूमिका घेतली. गोलखनाथ विरूध्द पंजाब राज्य या खटल्याचा निर्णय देतांना न्यायालयाने असे स्पश्ट केले की, मूलभूत अधिकारांचा संकोच करणारी घटनादुरूस्ती करण्याचा अधिकार संसदेला नाही. या निर्णयामुळे संसदेच्या सर्वश्रेष्ठत्वाला आव्हान मिळाले. 1971पर्यंत ही स्थिती कायम होती. बॅकांचे राष्ट्रीयीकरण व संस्थानिकांचे तनखेबंदी विधेयक या दोन्ही घटनादुरूस्त्या सर्वोच्च न्यायाजयानं घटनाबाह्य म्हणून रद्दबातल ठरविल्या. तेव्हा 2 / 3 बहुमत असलेल्या नवनिर्वाचित संसदेने 1971 साली राज्यघटनेत चोविसावी व पंचविसावी दुरूस्ती करू शकते हे जाहीरच करून टाकले. पुढे उद्भवलेल्या केशवानंद भागाची दुरूस्ती केरळ राज्य खटल्यात न्यायालयाने घटनेतील तिस–या प्रकरणात मूलभूत अधिकार दुरूस्ती करण्याचा संसदेचा अधिकार मान्य केला परंतु त्याच बरोबर पंचविसाव्या घटनादुरूस्तीचा काही भाग घटनाबाह्य घोशित केला व मौलिक संरचनेचे नवे तत्व प्रस्थापित केले. तेव्हापासून मौलिक संरचना या तत्वाबाबत संदिग्धता निर्माण झाली जी आजपर्यंतही कायम आहे. विशेश म्हणजे संसदेने केलेल्या कोणत्या स्वरूपाच्या दुरूस्तीमुळे राज्यघटनेची चौकट मोडीत निघते हे मात्र आजपर्यंतही न्यायालयाने पूर्णपणे स्पश्ट केले नाही.

1975 साली श्रीमती इंदिरा गांधीच्या निवडणूक वाद खटल्यासंबंधी निर्णय देताना सर्वोच्च न्यायालयाने आपल्या वरील भूमिकेचाच पुनरूचार केला व पंतप्रधानपदाच्या निवडणूकीला न्यायालयात आव्हान देता येणार नाही अशी त्या खटल्याच्या संदर्भात करण्यात आलेली 39 वी घटनादुरूस्ती अवैध घोशित केली. तात्पर्य, 1950 ते 1967 या सतरा वर्शाच्या काळात झालेल्या घटनादुरूस्तीच्या बाबतची वैधानिकता पडताळून पहाताना न्यायालयाने अशी भूमिका घेतली होती की, सामान्य काय़द्याद्वारे मूलभूत अधिकारांचा संकोच संसदेला करता येणार नाही. मात्र राज्यघटना दुरूस्तीद्वारे असा बदल केला तर त्याला घटनेतील कलम 13 (2) लागू होणार नाही. याचा अर्थ न्यायिक पुनर्विलोकनाचा आपला अधिकार सामान्य कायद्यापूरताच मर्यादित आहे हे न्यायालयाने जवळजवळ मान्यच केले होते.

घटना समितीत भाषण करताना नेहरूंनी स्पष्टपणे बजावले होते की, जनतेची सार्वभौम इच्छा संसदेमार्फत व्यक्त होत असते. परिणामी कोणतेही न्यायालय अशा इच्छेच्या इष्टा निष्टतेबद्दल निर्णय देउ शकत नाही. कोणताही न्यायाधीश किंवा कोणतेही न्यायालय भारतीय संसदेने तिसरे सभागृह बनू शकत नाही. म्हणजे संसदेने केलेल्या कायद्याचा बेरेवाईटपणा किंवा औचित्य– अनौचित्य पडताळून पाहण्याची सत्ता न्यायालयास नाही. मात्र राज्यघटनेचा संरक्षक म्हणून संसदेने पारित केलेल्या कायद्याची, अध्यादेशांची घटनात्मक वैधता अथवा सुसंगती तपासण्याचा आपला अधिकार निरंकुश आहे यावर सर्वोच्च न्यायालय ठाम आहे. शासनकर्त्यांनी पर्यायाने संसदेने व मंत्रिमंडळाने घटनाबाह्य कृती केली तर संवैधानिक संकेतांचे पावित्र्य अबाधित राखण्यासाठी न्यायालयांना हस्तक्षेप करणे अपरिहार्य व योग्यच ठरते. नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचा प्रश्न जेथे जेथे उपस्थित होईल तिथे न्यायालयाचा निर्णय अंतिम मानला पाहिजे. आपल्या देशात मात्र या लोकशाही परंपरा फारशा मजबूत झाल्या नाहीत. सर्वोच्च न्यायालयास प्राप्त झालेला न्यायिक पुनर्परीक्षणचा अधिकार ही भारतीय राज्यघटनेची देण आहे. त्याची तुलना कायदेमंडळाने संमत केलेल्या एखाद्या विधेयकाशी करणे कितपत सुसंगत आहे. याचाही विचार झाला पाहिजे. एकतर आपल्या राज्यघटनेने कायदानिर्मितीची फार मोठी सत्ता कायदेमंडळाकडे बहाल केलेली आहे. तेव्हा कायदा निर्मितीचा हा अधिकार वापरतांना संसद (कायदेमंडळ) घटनात्मक मर्यादांचे पालन करते आहे किंवा नाही हे पाहण्यासाठी न्यायसंस्थेला न्यायिक पुनर्परीक्षणाची सत्ता असणे अत्यंत आवश्यक आहे. शासनसंस्थांनीसुध्दा राज्यघटनेचे पवित्र्य जपले पाहिजे. तरच व्यक्तिस्वातंत्र्य अबाधित राहू शकेल.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium     Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net